<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(सकाळ)

जा.क्र.४८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०७/२०१७

**१) मुलीचा शारीरीक व मानसीक छळ, थापड बुक्यांनी मारहान करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

१ महिण्या पासुन ते दिनांक ०६/०७/२०१७ पर्यत. यातील फिर्यादी ही अनुसुचित जातीची आहे हे माहित असुन सुध्दा यातील आरोपीने फिर्यादीचे अंगाला वारंवार स्पर्श करुन व मोबाईलवर मॅसेज करुन छाती दाबुन शारीरीक व मानसीक छळ करुन तसेच थापड बुक्यांनी मारहान करुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४(अ)(१)(२),३५४(ड)(२),३२३ भांदवि. सहकलम ३(२)(व्ही)(अ) अ. जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड हे करीत आहेत.

**२) अविनाश रेस्टारंटचे समोरील दारवाज्याचा चॅनल गेटचा ताला तोडुन एलसीडी टिव्ही,.गॅस सिलेंडर व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०७/२०१७ ते ०७/०७/२०१७ चे २१.०० ते ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अविनाश केशव बावणकर वय २८ वर्ष, रा. करडी याचा अविनाश रेस्टारंट करडी येथे कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दारवाज्याचा चॅनल गेटचा ताला तोडुन आत प्रवेश करुन त्यातील १ एल.जी. कंपनीची एलसीडी टिव्ही किंमती १०,०००/—रु. ची २ रिकामे गॅस सिलेंडर किंमती ४,०००/—रु. व कॉऊंटरचे ड्रॉप मधुन नगदी १,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) अवैद्यरित्या ७६ कागदाच्या पुडीत ब्राऊन शुगरची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०७/२०१७ चे ००.३० ते ०२.५० वा. दर. फिर्यादी आरोपीचे कब्ज्यात अवैद्यरित्या ७६ कागदाच्या पुडीत एकुण ५ ग्रॅम ३६४ मिली ग्रॅम ब्राऊन शुगर/गर्द किंमती ५३६४/—रु. चा माल वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. सावने अम्ली पदार्थ विरोधी पथक पोलीस कार्यालय भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ८(क),१२(ब)एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटारपंपची चोरी . :—**

दिनांक ०६/०७/२०१७ चे ०२.०० ते ०४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी दादाराम राजाराम अन्नपुर्णा वय ६२ वर्ष, रा. म्हाळा कॉलोनी रुदांवन निवास प्लॉट क्र. १२९ खात रोड भंडारा याचे राहते घरी जिण्या खाली असलेली १ एचपीची मोटारपंप किंमती अंदाजे ४,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) २ अज्ञात इसमांनी एटीएम मशिन मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०६/०७/२०१७ चे १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे राजीव गांधी चौक भंडारा येथील युनीयन बॅक ऑफ इंडीयाचे एटीएम मध्ये त्याचे अलाहाबाद बॅकेच्या खात्यामध्ये चेक जमा झाला का म्हणुन बॅलेन्स चेक करणे कामी गेला असता २ अज्ञात इसमांनी त्याची फसवणुक करुन खात्या मधुन १०,०००/-रु. एटीएम मशिन मधुन काढुन नेल्याने फिर्यादी विजय नत्थुजी निंबार्ते वय ५२ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड टाकळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६(डी) माहीती तंत्रज्ञान कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुंभरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) बोलेरो गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल स्वारास धडक देवुन गंभिर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०७/०७/२०१७ चे २३.१९ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन सायकल स्वार अंकुश रघुनाथ निबार्ते वय ५५ वर्ष, रा. भिलेवाडा यास धडक देवुन गंभिर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सचिन मधुकर नेवारे वय २८ वर्ष, रा. भिलेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :-**

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा व गोबरवाही येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०४ लिटर ७५० मिली लिटर हातभट्टी दारु + १२ मोटार सायकल किंमती ३,३५,३७५००/-रु. १ लिटर ९८०देशी+ बिअर + विदेशी दारु किंमती १०५०/-रु. असा एकुण किंमती ३,३६,४२५/-रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनी. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.